Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII | ISSUE- IV | APRIL | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x

# मराठी आंबेडकरवादी काव्यातील विद्रोह

प्रा.डॉ. गोविंद नामदेव रावळेकर
मराठी विभाग प्रमुख
यशोदा गर्ल्स आर्टस् अॅन्ड कॉमर्स कॉलेज,
स्नेहनगर, वर्धा रोड, नागपूर–१५

*प्रास्ताविक :*

भारतरत्न बोद्धीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचा अस्पृश्य मुक्ती लढयाने या महाराष्ट्रालाच नव्हे तर या देशाला जगाला १४ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या दीक्षाभूमी येथे सहा लाख अनुयायांना अहिंसेच्या मार्गाने धम्मचक्र प्रवर्तन घडवून मानव मुक्तीचा संदेश या जगाला दिला. आणि ते ६ डिंसेबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले. या घटनेने अस्पृश्य बांधवावर एक महाकाय दु:ख कोसळले. या दु:खातून सावरण्याकरिता डॉ. बाबासाहेबांनीच येणाऱ्या संकटाची चाहुल ऐकून त्यांनी आपल्या दुरदृष्टीने आपल्या बांधवांसाठी लिहुन ठेवले होते ते म्हणजे 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या वाणीने अस्पृश्य तरूण जागृत होऊन ९ जुलै १९७२ रोजी 'दलित पॅंथर'ची स्थापना झाली. या स्थापने पासून तर नामांतराचा प्रश्न सुटेपर्यंत म्हणजे १९९४ पर्यतचा काळ आंबेडकरवादी साहित्य आणि चळवळीसाठी भरभराटीचा काळ मानला जातो. १९७२ ते १९९२ या दोन दशकात मराठी आंबेडकरवादी साहित्याने भारतातच नाहीतर जगाचे लक्ष आपल्याकडे वेधले. आंबेडकरवादी साहित्य हे मानवी मूल्यांची आणि मानवाधिकराची भाषा बोलते हेच आंबेडकरवादी साहित्य चळवळीचे ब्रीद आहे.

मराठी आंबेडकरवादी काव्य :

अस्पृश्याच्या अवहेलना आणि उपेक्षा हया बाबीना नकार देत अन्याय–अत्याचाराविरूद्ध आंबेडकरवादी काव्य विद्रोह करते. आंबेडकरवादी साहित्य हे जडवादी आणि मानवतावादी आहे. बुद्धीवादी आणि करूणावादी आहे. इहवादी आणि समाजवादी आहे. आंबेडकरवादी साहित्य हे ईश्वर, आत्मा, पूर्व वा पुर्नजन्म, परलोक, स्वर्ग–नरक या कोणत्याही अंधश्रद्धा मानत नाहीत. या साहित्यात 'मानव' केंद्रबिंदू आहे. १९७० आणि त्याच्या पुढे कवी नामदेव ढसाळंची कविता प्रत्येक सुशिक्षित अस्पुश्याच्या ओठावर आणि नियतकालिकांच्या पानावर झळकत होती. त्यांनी आपल्या 'गोलपीठा' या काव्यसंग्रहातून 'अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा' या कवितेतून विद्रोहाची ठिंणगी ने गुलाम जीवनाचे जगणे नको असते म्हणून ते म्हणतात

"अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
शब्द हुकारले
नरकाच्या कोंडवाडयात
किती दिवस राहायच आम्ही
श्वास घुसमटत!
......सडत होतो आम्ही अगतिक किडयांसारखे
आजपर्यंत.....
लक्तरात गुंडाळलेली आमची अब्रु
गोलपिठयावर नागविणाऱ्यांनो
तुमचा ऱ्हास जवळ आलाय:
मुक्तछंदाच्या संजीवनीने
आम्ही जिवंत झालो आहोत.
– तुमच्या पापाचे छिनाल घट फोडण्यासाठी!
– शब्द म्हणाले
अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा."

हा 'सूर्य' म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने गुलामाला गुलामाची जाणीव करून दिली आणि तो बंड करून उठला व या स्वाभिमानाने आणि अस्मितेने तो या नव्या उम्मीदीच्या नव्या जगाकडे डोके वर करून पाहू लागला. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्यकारांना आव्हान करताना

म्हणतात ''आपली लेखणी आपल्या प्रश्नांपुरती बंदिस्त करू नका. तिचं तेज खेडयापाडयातील अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं–दलितांचं फार मोठ जग आहे हे विसरू नका. त्यांच दु:ख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचचं जीवन उन्नत करण्यात झटा. त्यातच खरी मानवता आहे.''१ या बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने जे मराठी आंबेडकरवादी काव्य फुलते आहे त्या काव्याला सामाजिक सामूहिक भान जपणे किती गरजेचे आहे. हेच विचार व्यक्त होतांना दिसतात.

आंबेडकरवादी कवी दया पवार यांनी 'कोंडवाडा'या काव्यसंग्रहातून अस्पृश्य जाणिवांचा उत्कट आविष्कार साकारताना त्यांनी 'हे महाकवे' या काव्यातून व्यक्त केलेला जाणवतो ते म्हणतात.

''तुझा जन्म झाला गावाबाहेर
उपेक्षित वस्तीत... जिथे दु:खच जन्मले
तिथले विषण्ण चेहरे... काळजीने नांगरलेले
फळाफुलांनी नाही कधी बहरले
मुक्तीसाठी त्यांनी टाहो फोडलेले
खरच का ना ऐकले ?
तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक
तटतटून संतापाने पेटून उठला
रामराज्याची स्तुती गाणऱ्या
हे महाकवे....
तिथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला
हे महाकवे...
तुला महाकवी तरी कसे म्हणावे
हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास...
...तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते.''

इथे कवीला ऋषी वाल्मिकीने जे रामायण लिहून काढले. त्यात फक्त रामाचे गुणगान करून वर्ण पद्धतीलाच श्रेष्ठ ठरविण्याचा प्रयत्न केला गेला. समकालीन शुद्र ऋषी शंबुक परंपरेला व वर्ण पद्धतीला न जुमानता त्यांनी ज्ञानार्जना करून आपल्या आश्रमातील शिक्षाना प्रकृती, धर्म व मानव हित जोपासण्याचे विचार देवून सर्वमानव जाती एक आहे हा संदेश देणाऱ्या ऋषीची एक शुद्राला ज्ञानार्जना करण्याचा अधिकार नाही म्हणून हत्या करण्यात आली. महाकवी सुद्धा शुद्र ऋषी होते पण त्यांनी आपल्याच कुळातील वर्ण व्यवस्थेबद्दल पेटून उठणाऱ्या शंबुक ऋषी बद्दल एक श्लोक तरी लिहून ठेवला असता तर कवीने त्याचे नाव आपल्या काळज्यावर नक्कीच लिहून ठेवले असते.

आंबेडकरवादी कवी केशव मेश्राम यांच्या गर्भीत जीवनानुभवातून काव्याची सखोल जाणीव आणि परिणामकारक आविष्कार हे कवी मेश्राचा काव्याचे वैशिष्टये आहे. ते आपल्या 'उत्खनन' या काव्यसंग्रहातील 'वर्णमालेशिवाय' या कवितेत म्हणतात.

''मुके ओठ थरथरु लागले
भक्कम रुतलेल्या झाडांचे शेंडे थरारले
साचून राहिलेले पाणी उसळले कारंज्यासारखे
अशी समोर ये, कविते: कंबर कसून,रसरसून.
.....अशा सोशिक मातीचे ढिगारे: आपल्या मनात
कातळातील घणाघाती ओलावा कणाकणात
जुलवट डोंगरांचा असाह्य दाब वरून पडू दे
कविते; तू उसळ कारंज्यासारखी
आजपर्यंत मुक्या ओठांवर वर्णमालेशिवाय''

ज्या वर्णपद्धतीने अमानुष्यता दिली ती अमानुष्यता नष्ट करून उपेक्षीत, शोषित, पिडीत जीवनाला कलाटणी देण्याची वेळ आली आहे. ती काव्याचा स्वरूपातून जनजागृत करण्याची वेळ आपी आहे. ज्या आपल्या पिढयानुपिढया मुके होऊन असाहय वेदना, दु:ख सहन करून या वर्ण व्यवस्थेलाच आपले आयुष्य समजून आपली अवस्था ही 'जगाव की मराव' या प्रश्नाचा शोध घेत नव्हते. त्या प्रश्नाच्या पलीकडचा शोध या शिक्षणानेच वर्णव्यवस्थेविरूद्धचा बंड फुकारण्याचे सामर्थ निर्माण केले आहे. आणि आपल्या पिढयानुपिढया झालेल्या अन्याय, अत्याचाराची कोंडी फोडण्याचे काम ते आपल्या शिक्षित तरूण्यावर आालेले आहे. फक्त आपल स्वत:च हक्क न पाहता येणाऱ्या भावी

पिढीकडे स्वातंत्र्याची, समतेची, बंधुत्वाची आणि न्यायाची सुमने त्यांच्या हाती देऊन. त्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी ही वर्णव्यवस्था नाकारून. आपल्याला नव्या धम्माकडे धम्म दीक्षा घेऊन, मानवाला माणूसकीचे गीते या कवितेच्या स्वरूपात गायची आहे. आणि मानवतेची क्रांती घडवून आणायची आहे. हेच कवी 'वर्णव्यवस्थे शिवाय' या काव्यातून मानवतेसाठी बंड करतांना दिसतात.

कवी वामन निंबाळकर यांनी आपल्या कवितेतून व्यक्त होताना जीवनातील दु:ख प्रकट करतांना गावकुसाबाहेरील कवितासंग्रहातील 'दु:ख' या कवितेत ते म्हणतात.

''माझ्या दु:खाची जात वेगळी आहे
अंधाराचे हुंदके प्रकाशाचे उसासे
माझ्या दु:खापुढे फिके पडतात
फिके पडले विरहाचे गीत
जातीजातीच्या भिंतीचे रिवाज, रीत
तुच्छतेचे वलय मला खाऊन टाकते
तशी व्यथेची जखम भरभरून वाहे
माझ्या दु:खाची जात वेगळी आहे.''

कवीने भोगलेल्या जीवनाच्या वाटा हया अतिशय गंभीर आहे. त्या काळजात इतका खोलवर रूतलेल्या आहेत की, त्याचे तपशीलवार मोजनी केली तरी ते नसंपणारे असे द ु:ख आहे. ते जातीयतेचे, ते तुच्छतेल नाकारण्याचे ते रितीरिवाज परंपरेचे असे अंगणित दु:ख कवीच्या पदरी पडल्याने या दु:खाचे उगम कुठून निर्माण झाले आहे. त्या उगमापासूनच कवी या दु:खाला नष्ट करण्याचा यशस्वी प्रयत्न या कवितेतून कवी करतांना दिसतात.

कवी यशवंत मनोहर हयांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिंतन काव्य' मधून 'भीमराव रामजी आंबेडकर'या कवितेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना दिलेली मानवमुक्ती ही एक क्रांतीच होती. ती क्रांती स्वातंत्र्याचा पलिकडचीच होती. त्या मानवमुक्ती क्रांतीच्या शोधात कवी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना न विसरता स्वातंत्र्य, समता, बंधुत्वा व न्याय या विचारक्रांतीच्या मुळाशीच आपल आचरण असायलाच पाहिजे. ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले. ते म्हणतात

''आमची लक्तरलेली आयुष्ये शिवलीस
तो सुईदोरा कुठे ठेवलास ?
....... आणि मला 'ही' समजून घेऊ शकेल
ते तुझे सागराएवढे शहाणपण तू कुठे ठेवलेस
ज्याच्यावर विनम्र होऊन मी ललाट ठेवावे
ते तुझ्या चरणाचे युद्धतीर्थ तू कुठे ठेवलेस
......अरे, या मनूच्या मुलांनाही माणूस होणे भागच पडेल
अशी तुझी ती जहाल घटना तू कुठे ठेवलीस.
परमेश्वराच्या प्रेतावर बसून कर्मविपाकाला माती दिलीस
ती रूढीच्या संतानांना हैराण करणारी युगंधर जिद्द तू कुठे ठेपलीस
अरे, या बेशरम अत्याचाराला फाडताना आम्ही विजयी होऊच
अरे तुझे विजांचे शस्त्रसाठे तू कुठे ठेवलेस कुठे ठेवलेस!''

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रगल्भतेने आजच्या २१ व्या शतकातील तरूण पिढीला त्यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालणे अत्यंत गरजेचे आहे. हा क्रांतीचा संदेश इथे कवी देवू इच्छितात. आणि म्हणूनच कवी प्रल्हाद चेंदवणकर आंबेडकरवादी कवीच्या विद्रोहा बद्दल आपले मत व्यक्त करताना म्हणतात ''अन्याय–अत्याचार स्वरूप पाहून तरूण दलित साहित्यिकांची माथी भडकत होती. कानशिल तापत होती आणि त्यांच्या मनातील आग त्यांच्या लेखणीतल्या शब्दांमधून व्यक्त होत होती. ते शब्द बंदुकीतून सुटलेल्या गोळयासारखे आपल्या शत्रूचा वेध घेत होते त्यावेळी लिहिल्या गेलेल्या बहुसंख्य दलित कविता, कथा आणि लेख म्हणजे दलित समाजाच्या प्रक्षुब्ध भावनाचा कल्लोळ होता.''२ यावरून असे लक्षात येते की, आंबेडकरवादी कवीनी आपल्या काव्यातून समाजातील विषमतेविरूद्ध विद्रोह फुकारला होता.

आंबेडकरवादी कवयित्री हिरा बनसोडे यांनी 'फिनिक्स' या काव्यसंग्रहातून 'गुलामीच्या डंखकळा' या कवतेतून अस्पृश्य हया जातीत जन्म घेणे हे पापच आहे की या पापाला पाप न मानता नव्या उम्मदीने नव्या विचाराने या 'वर्ण'च पद्धतीला बदलून नव्यानेच पुरोगामी विचाराची कास धरून जन्म घेण्याची भाषा कवितेतून मांडतांना कवयित्री म्हणतात.

''कसा लाभला हा जल्म
म्हणे मानव जातीचा
जातीजातीतल्या भिंती
उर फाटतो मातीचा
कसा लाभला हा जल्म
तसा का हो मी सोसीन ?
माय भीमाईच्या पोटी
जल्म सूर्याचा घेईन''

कवयित्रीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीकारक विचार धारेनेच जो मिळालेला जन्म आहे तो अमानुष्यतेतून 'मानव मुक्ती'च्या आदोलनाकडे नेणारी एक महान विचार क्रांती आहे. जी 'वर्ण' पद्धतीलाच नष्ट करून फक्त मानवाच्या माणूसकीचाच झेंडा या विचार क्रांतीने होवू शकतो अशा आशावाद त्यांनी या कवितेतून मांडलेला दिसतो.

आंबेडकरवादी कवयित्री ज्योती लांजेवारांच्या कवितेमध्ये स्त्रीच्या व्यथा वेदना बरोबरच या व्यथा वेदनेतील व्यापक विद्रोह त्यांच्या कवितेतून प्रगटतांना दिसते. त्यांच्या 'अजून वादळ उठले नाही' या काव्यसंग्रहातील काव्य 'जाळू नये तर काय ?' या कवितेमध्ये पुरूष प्रधान संस्कृतीने केलेला स्त्रीयांचा छळ हा ग्रंथलिखित किंवा महाकाव्यापुरता मर्यादित नव्हता तरा तो संपूर्ण स्त्री जातीचा व्यथा वेदनेचा एक भाग होऊन बसलेला होता या व्यथा वेदनेची चीड प्रकर्षाने कवयित्री आपल्या कवितेत मांडतांना म्हणतात.

''सखे
सारा हिशेब चुकता करीत म्हटलं,
इतिहासाच्या पानांवरचे संदर्भ मिटविन म्हटलं,
घरंदाज श्वासांना मोकळी हवा देईन म्हटलं
स्थिरावलेल्या प्रवाहांना प्रलयाहाती देईन म्हटलं
पण काय करू ?...
तुझ्या पूर्वापार आठवणीच्या मयसभेत
एकेक जखम नग्न होत जाते
हृदयही मान घालते भिष्मासारखी
......धृतराष्ट्राच्या सदैव बंद डोळयासारखे.
कधी कधी
गांधारी होवून डोळे बांधावे तेव्हा
आसवांचा उत्सव पापण्याच्या आड
ओठांवर कुंतीचे अबोलपण घेऊन
सूर्याशी भांडावेसे वाटते कर्णासाठी.
....मंदिरातल्या घणघणाटासारखे
मोकळया केसाचेही सत्व
आज तुडविल्या जाते पायाखाली
मग–युद्धाचे शंख फुंकू नये तर काय?
...पुन्हा नवे महाभारत लिहू नये तर काय?
मनुच्या स्मृतीला
जाळू नये तर काय?''

'वर्ण' पद्धतीत मनूस्मृतीत अतिशूद्र म्हणून समस्त स्वर्ण, अस्पृश्य स्त्रीयावर होणारे अन्याय–अत्याचार ही आधुनिक 'स्त्री' जेव्हा इतिहासाचे पाने उलगडून बघते तेव्हा तीला प्रत्येक वेळी 'स्त्री' ही 'अबला' दिसते. त्यामुळे महाकाव्य असलेल्या 'महाभारतात' इतिहास जमा असलेल्या स्त्रीया असो किंवा ज्या मनूस्मृतीने लादून दिलेल्या अतिशूद्र स्त्रीया असो त्याची चीड प्रकर्षाणे कवयित्रीच्या मनाला स्पर्श करून जाते. आजपर्यंत जे झाले ते पूरे झाले बसं!... आता ही 'स्त्री' शिक्षणाने जागृत होऊन कळलं की, ज्या ग्रंथाना पुरूषप्रधान संस्कृतीचे सामर्थ लाभलेले आहे. त्या ग्रंथाला आज नाकारायलाच पाहिजे. या अमानुष्य परंपरेला नष्ट करणे आजच्या काळाची गरज आहे. आजची 'स्त्री' ही 'अबला' न राहता 'सबला' होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि 'पुरूषप्रधान' संस्कृती बरोबरच 'मनू' संस्कृतीच्याही नायनाट करायलाच पाहिजे तेव्हाच आपल्या सर्व समस्त 'स्त्री' जातीचे उद्धार होण्यासाठी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या मनूस्मृतीचे दहन कले ते फक्त समस्त मानव हितासाठी ही बाजू समझून मलासुद्धा आपल्या समस्त 'स्त्री' उद्धारासाठी ज्या–ज्यावेळेस अशा अमानुष्य परंपरेचे ग्रंथ मनूस्मुतीचे दहन करावे लागेल त्या–त्यावेळेस मी नक्कीच दहन करनेच अशी विद्रोही भाषा कवयित्री आपल्या काव्यातून प्रगट करतांना दिसतात. अशा कृतीशील विद्रोही अभिव्यक्तीवर डॉ. संजय मून आपले मत व्यक्त करतांना म्हणतात ''आत्मभानाची प्राप्ती आणि हात जागे झाल्याची जाणीव ही अभिव्यक्तीला वाट निर्माण करून देते. माणसाला नागवणारे कायदे करणारे धर्मग्रंथ, संस्कृती, तिचा पाखंडीपणा या सर्वाचा विरोधात हा आविष्कार झाला आहे. शीवी देणे ही अशिष्ट मानलेली बाब विद्रोहात्मतेमुळे संघर्षाच्या संदर्भात प्रतिष्ठेची ठरली आहे. नकार ही चिंतनशीलतेची एक बाजू असते. मात्र हीच चिंतनशीलता जेव्हा भावनेच्या तीव्रतेसह व्यक्त होते तेव्हा त्या चिंतनशीलतेलाच विद्रोहाचे रूप प्राप्त होते. चिंतनशील भाषेचे संकेत धुडकावून ही चिंतनशीलता आवेगातील शब्द भाषेतून व्यक्त व्हायला लागते. अशाप्रकारे विद्रोहाची अभिव्यक्ती होते.''३ या व्यक्तव्यावरून असे लक्षात येते की, या विद्रोही अभिव्यक्तीनेच दुर्दम्य आत्मविश्वाची भाषा आविष्कृत होते.

**निष्कर्ष :–**

'मराठी आंबेडकरवादी काव्य' हे खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रणालीचा व चळवळीच्याच पाया आहे. ही जाणीव अमानृष्यतेलाच नाहीतर संपूर्ण वर्ण पद्धती व वर्ग पद्धतीलाच प्रकर्षाणे विरोद्ध करून मानव हितार्थ माणूसकीचा डंका येणाऱ्या या २१व्या शतकातील साहित्य संस्कृतीचा पायाच निर्माण व्हावा. अशी आशा या विचारधारे मध्ये अंगभूत आहे. ती जात, वर्ग, धर्म, लिंग, पंथ इ. बाबीमुळे भारतीय जीवनात जी शोषणविकृती निमार्ण झाली आहे. तिच्या विरोद्धात ही आंबेडकरवादी काव्य बुद्धीवादी, विज्ञानवादी, विवेकवादी, अंधाश्रद्धानिमूर्लनाची कास आणि सम्यक–सुवण–मध्य विचारांने अशा अगणित विचारधारेने 'मानवीय धर्म' जोपासणाऱ्या अशा साहित्यकांची शिदोरी या विचारधारेत असल्याने या एकेविसाव्या शतकात 'मानव्यक्रांती' हीच माणूसकीची ठरावी. या नात्याने जे या शोधनिबंधाचा संशोधनात कवी नामदेव ढसाळ, दया पवार, केशव मेश्राम, वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, आणि कवयित्री हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार यांच्या कवितेच्या अनुषंगाने 'मराठी आंबेडकरवादी काव्या'ला विद्रोही विचाराची बैठक लाभलेली दिसते.

**संदर्भ टीपा :–**

१)आंबेडकर, बाबासाहेब : उद्धृत, आंबेडकरवादी मराठी साहित्य, पृ. १६५.

२)चेंदवणकर, प्रल्हाद : दलित पॅथर (संपा.) शरणकुमार लिंबाळे, पृ. २८.

३) मून, संजय : शैली : दलित कवितेची, पृ.१४९.

**संदर्भ ग्रंथ :–**

१) लिबाळे, शरणकुमार (संपा.) : ''भारतीय दलित साहित्य'', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती २०१३.
२) रंगराव, बी (संपा.) : ''मराठी दलित कविता'', साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प्र. आ. २००४, पुन्हा २००७.
३) मनोहर यशवंत : ''आंबेडकरवादी मराठी साहित्य'', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९९.
४) लिंबाळे, शरणकुमार (संपा.) : ''दलित पॅथर'', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९.
५) मून , संजय : ''शैली : दलित कवितेची'', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. २००९.
६) मेश्राम, केशव (संपा.) : ''विद्रोही कविता'', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७८.
७) फडके, भालचंद्र : ''दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह'', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९.
८) भवरे, महेंद्र : ''दलित कवितेतील नवे प्रवाह'', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. २००१.
९) लिंबाळे, शरणकुमार (संपा.) : ''शतकातील दलित विचार'', दिलीपराज प्रकाशन, पुणे–३०, प्र. आ. १५ जुलै २००१, दु. आ. १५ जून २००७.

१०) ठाकूर, भगवान : ''आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे'', आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १४ एप्रिल २००९.

११) भवरे, महेंद्र : ''दलित कविता आणि प्रतिमा'', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई—२५, प्र. आ. फेब्रुवारी २०१२.